महाराष्ट्र शासन

**छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा**

**Chhatrapati Sambhaji Maharaj Government Medical College and Hospital Satara,**
**467, Sadar bazar, Camp, Satara 415001**

**Phone No 02162-299763** **Email id :- deangmcsatara7@gmail.com**

जा.क्र.छसंमशावैमवरुसा/ प्राध्या.,सहयोगी प्राध्या./ जाहिरात/ ३०३ /26 दि.२३/०१ /2026

# जाहिरात

**विषय :-** वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा येथील चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विभागातील विविध विषयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक तथा सहायक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत..

**संदर्भ :-** १) शासन नि. सामान्य प्रशासन विभाग क्र संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७/१२/२०१६

२) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग शासन निर्णयक्र.एलईसी-२०२१/प्र.क्र१९९/वैसेवा-३ दिनांक ०९-०२-२०२२.

३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांची प्राप्त सूचना दि. १९/११/२०२५

संचनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखाली छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा येथे वैद्यकीय अध्यापन व रुग्णसेवा याकरीता चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विभागातील विविध विषयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक तथा सहायक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पदे संस्थास्तरावर करार पद्धतीने ३६४ दिवसांकरीता निव्वळ व तात्पुरत्या स्वरुपात भरण्याकरीता इच्छूक पात्र उमेदवारांकडून ऑफलाईन स्वरुपात (प्रत्यक्षरित्या) अर्ज मागविण्यात येत आहेत. संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या www.med-edu.in व www.gmcsatara.org या संकेतस्थळावर जाहिरात दि २३/०१/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येत आहे. इच्छुक पात्र उमेदवारांकडुन दिनांक २७/०१/२०२६ ते दि. ०३/०२/२०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत (रविवार व शासकीय सुटटी वगळून) अर्ज ऑफलाईन (प्रत्यक्षरित्या) छ. सं. म. शा. वै. म. व रु सातारा येथील प्रशासकीय कार्यालयात स्विकारले जातील.

उमेदवाराने अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रांची छायांकित प्रत स्व साक्षांकित करुन अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.

प्राध्यापक-

| अ.क्र. | विषयाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता, अनुभव |
|---|---|---|---|
| १ | औषधवैद्यकशास्त्र | २ | *As per NMC TEQ notification Dated १४/०२/२०२२ |
| २ | मनोविकृती शास्त्र | १ | |
| ३ | क्षयरोग व उररोगशास्त्र | १ | |
| ४ | कान, नाक, घसा शास्त्र | १ | |
| ५ | क्ष- किरणशास्त्र | १ | |
| ६ | स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र | १ | |
| | एकूण | ०७ | |

सहयोगी प्राध्यापक-

| अ.क्र. | विषयाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता, अनुभव |
|---|---|---|---|
| १ | औषधवैद्यकशास्त्र | २ | *As per NMC TEQ notification Dated १४/०२/२०२२ |
| २ | शल्यचिकित्साशास्त्र | २ | |
| ३ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | १ | |
| ४ | शरिरविकृतीशास्त्र | २ | |
| ५ | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | १ | |
| ६ | क्ष- किरणशास्त्र | १ | |
| ७ | इर्मजन्सी मेडिसीन | १ | |
| ८ | बधिरीकरणशास्त्र | १ | |
| | एकूण | ११ | |

सहाय्यक प्राध्यापक-

| अ.क्र. | विषयाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता, अनुभव |
|---|---|---|---|
| १ | शरिररचनाशास्त्र | ०१ | *As per NMC TEQ notification Dated १४/०२/२०२२ |
| २ | शरिरक्रियाशास्त्र | ०१ | |
| ३ | औषधशास्त्र | ०२ | |
| ४ | शरिरविकृतीशास्त्र | ०२ | |
| ५ | सुक्ष्मजीवशास्त्र | ०१ | |
| ६ | न्यायवैद्यकशास्त्र | ०१ | |
| ७ | रोगप्रतिबंधक व सामाजिक औषधवैद्यकशास्त्र | ०३ | |
| ८ | औषधवैद्यकशास्त्र | ०४ | |
| ०९ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ०१ | |
| १० | मनोविकृती | ०१ | |
| ११ | क्षयरोग व उररोगशास्त्र | ०१ | |
| १२ | शल्यचिकित्साशास्त्र | ०१ | |
| १३ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | ०१ | |
| १४ | कान, नाक व घसा | ०१ | |
| १५ | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र | ०१ | |
| १६ | बधिरीकरणशास्त्र | ०२ | |
| १७ | क्ष- किरणशास्त्र | ०२ | |
| १८ | इर्मजन्सी मेडिसीन | ०२ | |
| | एकूण | २८ | |

* NMC TEQ ३०/०६/२०२५ उपलब्ध झाले असून, ते लागू करण्याबाबत मा. संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई कार्यालयाशी पत्रव्यवहार केला आहे. परंतु अद्याप त्या पत्रास उत्तर आलेले नाही. तरी पत्र व्यवहारास मान्यता मिळाल्यास शैक्षणिक पात्रता NMC TEQ ३०/०६/२०२५ नुसार ग्राह्य धरण्यात येईल.

टीप- सदर माहिती मधील नमूद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पूर्णपणे रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

महत्वाची टीप–

१ उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

२ उमेदवाराचे वय नियुक्ती वेळेस दिनांक 23/01/२०२६ रोजी कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३.मानधन–

अ. सेवानिवृत्त अध्यापकांची करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास यांना शासन निर्णय दिनांक १७/१२/२००६ मधील तरतुदीनुसार दरमहा खालीलप्रमाणे मानधन अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | पदनाम | विषय | दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक | चिकित्सालयीन -सातारा | २,००,०००/- |
| २ | सहयोगी प्राध्यापक | चिकित्सालयीन -सातारा | १,८५,०००/- |

तसेच सहायक प्राध्यापक या पदासाठी मानधन ठोक रक्कम रु. १,००,०००/- राहिल.

१. **नियम व अटी–**

१. करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी या पैकी जे आधी घडेल इतका राहील. तथापी सदरहू पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील.

२. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता किंवा गैरवतर्वणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसुचनेशिवाय संपुष्टात येईल.

३. करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकानुसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षीत कामे पार पाडणे आवश्यक राहील.

४. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधीत कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

५. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तिक रजा अनुज्ञेय असेल.

६. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाही.

८. उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र सादर करणा-या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत, विद्यार्थ्यांचे हित विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.

९. बिगर सेवानिवत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणा-या अध्यापकांची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

१०. अर्जदाराने संबंधित पदासाठी शारिरीक दृष्टया पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

११. सदर जाहिरातीमधील नमूद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहीरात पूर्णत: रद्य करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

१२. अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणताही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१३. अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१४. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१५. मुलाखतीस येताना उमेदवारांनी सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मूळ कागदपत्रे सोबत येताना आणणे बंधनकारक राहील.

उपरोक्त पणे नमूद केलेनुसार प्राध्यापक गट-अ वर्गाची ०७ पदे, सहयोगी प्राध्यापक गट-अ वर्गाची ११ पदे व गट-ब वर्गाची २८ पदे भरण्यास मान्यता असावी.

डॉ. विनायक काळे
अधिष्ठाता,
छत्रपती संभाजी महाराज शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय, सातारा.

(डॉ. विनायक काळे)
अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय,सातारा.

प्रति,

१. उपरोक्त संबंधित सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा.
२. सुचनाफलक अधिष्ठाता कार्यालय, विद्यार्थी विभाग, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा.
३. सर्व मा. अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई, पुणे, सोलापुर, कोल्हापुर, अंबाजोगाई, लातुर, मिरज, नांदेड, अकोला, यवतमाळ, नागपुर, धुळे, औरंगाबाद, चंद्रपुर, गोंदिया, बारामती, सिंधुदुर्ग, अलिबाग, उस्मानाबाद, परभणी, रत्नागिरी, नंदूरबार, जळगाव,
४. रोखपाल, रोखपाल शाखा, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी महाविद्यालयाच्या इच्छुक सहाय्यक प्राध्यापक, वरिष्ठ निवासी उमेदवारांकडून (शासकीय सुट्टी वगळुन) या कार्यालयातुन जाहिरातीच्या दिनांकापासून विहित कालावधीत फॉर्म फी रु.१००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) स्विकारुन उमेदवारास शासकीय पावती द्यावी.

प्रत-

१. मा.सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर
३. मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई